लेखक मानवाधिकार चळवळ
**डॉ.धनंजय खैर** (होमिओपॅथी तज्ञ) यांचे
३० वर्षाचा अनुभव असलेले कराडमधील एकमेव
**होमिओपॅथी क्लिनीक**
ऑपरेशन शिवाय नाकातील वाढलेले हाड, मुतखडा, पिताशयातील खडा, दमा यासारख्या जुनाट आजारावरील उपचारासाठी भेटा.
टिळक हायस्कुल जवळ, कराड मोबा:९३७०३३२४१३

जनसामान्यांचा बुलंद आवाज
# कर्मयोगी
Karmayogi
मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर
कराड (सातारा) वर्षः२५ | अंकः२०९ RNI NO.MAH-MAR/2001/3806 | संपादिकाःसौ.मंगल नंदकुमार लोखंडे | प्रबंध संपादकःश्री.संजय पवार | शनिवार दि.१ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | किंमत २ रूपये
Karad(Satara) Vol-25 | Ishue-209 RNI NO.MAH-MAR/2001/3806 | Editor Mrs.Mangal Nandkumar Lokhande | Saturday 1 Februay 2025 | Pages 4 | Price 2 Rs.

# जागतिक आव्हानात सरकारने अर्थव्यवस्थेला धोरणात्मक निष्क्रीयतेतून बाहेर काढले: राष्ट्रपती

## अभिभाषणाने संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनास सुरुवात

**नवी दिल्ली,दि.३१(वृत्तसंस्था)**
राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने शुक्रवारी, संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात झाली. मध्यमवर्गासह दलित, वंचित आणि आदिवासींच्या विकासाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बोलून केंद्र सरकारचे धोरण स्पष्ट केले. त्यांनी सरकारच्या पारदर्शक कार्यशैलीचे कौतुक केले. कोविड-१९ महामारी आणि युद्धाशी संबंधित अनिश्चितता यासारखे जागतिक आव्हाने असूनही, सरकारने अर्थव्यवस्थेला धोरणात्मक निष्क्रीयतेच्या स्थितीतून बाहेर काढण्यासाठी दृढनिश्चयाने काम केले आहे, असे राष्ट्रपती म्हणाल्या.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीला संसदेच्या दोन्ही सभागृहांना संयुक्त संबोधित करताना राष्ट्रपती म्हणाल्या की, केंद्र सरकार मागील प्रशासनांपेक्षा तिप्पट वेगाने काम करत आहे. यावेळी त्यांनी वक्फ बोर्ड आणि एक देश, एक निवडणूक यासारख्या मुद्द्यांवर घेतलेल्या निर्णयांचा उल्लेख केला. सरकारने तरुणांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले आहे. त्यांच्यासाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. यावेळी राष्ट्रपतींनी महाकुंभात चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहिली.



त्यांनी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनाही श्रद्धांजली वाहिली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अभिभाषणात सरकारच्या योजनांचा उल्लेख केला. त्या म्हणाल्या की, सरकार कृषी उत्पादनांना योग्य भाव देण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी काम करत आहे. सरकारने ३ कोटी अतिरिक्त कुटुंबांना नवीन घरे देण्यासाठी पंतप्रधान आवास योजनेचा विस्तार केला आहे. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत, ६ कोटी नागरिकांना आरोग्य विमा देण्याचा निर्णय घेतला. सरकारचे तरुणांच्या शिक्षणाकडे आणि नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्याकडे विशेष लक्ष आहे. कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमधील परिस्थिती बदलली आहे. याशिवाय, सरकारने ईशान्येकडील लोकांमध्ये असलेली परकेपणाची भावना संपवण्याचा प्रयत्न केला आहे, असे त्या म्हणाल्या.

राष्ट्रपती म्हणाल्या की, डिजिटल फसवणूक, सायबर गुन्हे आणि डीपफेक हे सामाजिक, आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेसमोरील आव्हाने आहेत. भारताच्या यूपीआय तंत्रज्ञानाने अनेक विकसित देशांवरही प्रभाव पाडला आहे. गेल्या दशकात, भारताने जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीमध्ये अनेक टप्पे गाठले आहेत. या आधुनिक पायाभूत सुविधांमुळे जगात भारताची प्रतिमा मजबूत झाली आहे, गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास वाढला आहे. उद्योगांना बळकटी मिळाली आहे आणि नवीन नोकऱ्या निर्माण होत आहेत.

राष्ट्रपती म्हणाल्या की, शहरी वाहतूक सुरळीत करण्यासाठी सरकार सतत काम करत आहे. दिल्ली, पुणे, ठाणे आणि बेंगळुरूमधील मेट्रो प्रकल्प आणि अहमदाबाद-भुज मार्गावर सुरू केलेली नमो भारत रॅपिड रेल सेवा ही विकसित भारतीय शहरांची वैशिष्ट्ये आहेत.

राष्ट्रपती म्हणाल्या की, मध्यमवर्गीय जितके मोठे स्वप्न पाहतील तितका देश उंचीवर जाईल. सरकारी कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी सरकारने आठवा वेतन आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. एकीकृत पेन्शन योजनेअंतर्गत लाखो केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना पन्नास टक्के खात्रीशीर पेन्शन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, ज्याचे सर्वत्र स्वागत झाले आहे, असे त्या म्हणाल्या.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अभिभाषणासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सहा घोड्यांच्या गाडीतून आल्या. संसदेच्या परिसरात त्यांचे स्वागत उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी केले. राष्ट्रपतींना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला.

# १० वर्षात पहिल्यांदाच परकीय हस्तक्षेपाशिवाय संसदीय अधिवेशनाला सुरुवात: पंतप्रधान

**नवी दिल्ली,दि.३१(वृत्तसंस्था)**



मागच्या १० वर्षात पहिल्यांदाच कोणत्याही परकीय हस्तक्षेपाशिवाय संसदीय अधिवेशन सुरु होत असल्याचा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी केला. प्रत्येक अधिवेशनाच्या सुरुवातीला परकीय ताकदीकडून आग लावण्याचा प्रयत्न केला जातो, त्याला देशातील काही लोक हवा देतात. २०१४ नंतर कदाचित हे पहिले संसदीय अधिवेशन असेल जिथे अधिवेशनापूर्वी परकीय ताकदीकडून गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न झाला नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला शुक्रवारी सुरुवात झाली. त्यापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी संसद परिसरात माध्यमांना संबोधित केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, पुढील २५ वर्षे समृद्ध आणि विकसित भारत साध्य करण्यासाठी समर्पित असतील. सरकार भौगोलिक, सामाजिक किंवा आर्थिकदृष्ट्या सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने मिशन मोडमध्ये पुढे जात आहे. सर्व राज्य आणि केंद्र सरकारने एकत्रितपणे काम केले पाहिजे, लोकसहभागामुळे परिवर्तन घडेल, असे मोदी म्हणाले. देशातील प्रत्येक गरीब आणि मध्यमवर्गीयांवर देवी लक्ष्मीची कृपा राहावी यासाठी पंतप्रधान मोदी यांनी प्रार्थना केली.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, २०४७ पर्यंत, जेव्हा भारत स्वातंत्र्याची १०० वर्षे साजरी करेल, तेव्हा देश विकसित देश बनण्याचे आपले ध्येय साध्य झालेले असेल. नवोपक्रम, समावेशकता आणि गुंतवणूक हे देशाच्या आर्थिक रोडमॅपचा पाया आहे. या अधिवेशनात अनेक ऐतिहासिक विधेयक आणि प्रस्तावांवर चर्चा केली जाईल, ज्यामुळे राष्ट्राला बळकटी देणारे कायदे तयार होतील. धार्मिक आणि सांप्रदायिक भेदांपासून मुक्त राहून प्रत्येक महिलेसाठी समान हक्क प्रदान केले पाहिजेत, असे ते म्हणाले. हे ध्येय साध्य करण्यासाठी या अधिवेशनात महत्त्वाचे निर्णय घेतले जातील असे त्यांनी सांगितले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज जे तरुण २०-२५ वयोगटातील आहेत, ते ४५-५० वर्षांचे झाल्यावर विकसित भारताचे सर्वात मोठे लाभार्थी असतील. विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्याचे प्रयत्न सध्याच्या किशोरवयीन आणि तरुण पिढीसाठी एक महत्त्वाची भेट असेल. त्यांनी याची तुलना १९३० आणि १९४० च्या दशकात स्वातंत्र्यासाठी लढलेल्या तरुणांशी केली, ज्यांच्या प्रयत्नांमुळे २५ वर्षांनंतर स्वातंत्र्याचा उत्सव साजरा झाला. या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सर्व खासदारांना विकसित भारताचे स्वप्न बळकट करण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले. तरुण खासदारांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे, असे ते म्हणाले. पंतप्रधानांनी आशा व्यक्त केली की अर्थसंकल्पीय अधिवेशन राष्ट्राच्या आकांक्षा पूर्ण करेल.

# वाद निर्माण करणे हा मराठी माणसांचा स्थायी भाव:मुख्यमंत्री

## ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णीक यांना विश्व मराठी साहित्य भुषण पुरस्कार प्रदान

**पुणे,दि.३१(वृत्तसंस्था)**
साहित्य संमेलन, नाट्य संमेलन, विश्व संमेलन असो वाद निर्माण झाला नाही तर मराठी संमेलन होऊच शकत नाही. वाद निर्माण करणे हा मराठी माणसांचा स्थायी भाव आहे. याच कारण म्हणजे आपण संवेदशील लोक आहोत. त्यामुळे वाद, विवाद, प्रतिवाद झालाच पाहिजे यातूनच खऱ्या अर्थाने मंथन होऊ शकते, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विश्व मराठी संमेलनाबाबत झालेल्या वादावर टिप्प्पणी केली.

राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागाच्या वतीने आयोजित तिसऱ्या विश्व मराठी संमेलनाचे




उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.निलम गोऱ्हे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, आमदार सिद्धार्थ शिरोळे, बापुसाहेब पठारे आदी उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णीक

**पान नं.४ वर...**

# प्रियकराच्या मदतीने आईनेच रचला मुलाच्या खूनाचा कट

## पोलिसांच्या सतर्कतेमुळे तरूणाचा जीव वाचला; चौघांना अटक

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.३१**
आईनेच प्रियकराच्या मदतीने तरुण मुलाच्या खुनाचा कट रचला. प्रियकराने दोन साथीदारांच्या मदतीने दगडाने ठेचून मुलाचा खून करण्याचा प्रयत्नही केला. मात्र, पोलिसांच्या सतर्कतेमुळे संबंधित तरुणाचा जीव वाचला असून याप्रकरणी चौघांना अटक करण्यात आले आहे. कराड तालुक्यातील वराडे येथे ही घटना घडली.

शोभा महादेव शेंडगे (वय ३८, रा.काटेपुरम चौक, पिंपळे गुरव, सांगवी, ता.हवेली, जि.पुणे) जयेंद्र



**कराड:अटक केल्या चौघा संशयितांसमवेत उपअधीक्षक अमोल ठाकूर, पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप, सहाय्यक निरीक्षक किरण भोसले, अशोक भापकर व इतर**

गोरख जावळे (वय ४०, रा.सांगवी, ता.हवेली. जि.पुणे) सिद्धार्थ विलास वाव्हळे (वय २५, रा. मातोश्रीनगर, वांगी रोड, परभणी), अकबर मेहबूब शेख (वय २५, रा.निकाळजे वस्ती, बाणेरगाव, बालेवाडी स्टेडियमजवळ, ता. हवेली) अशी अटक केलेल्या चौघांची नावे आहेत. तर खुनी हल्ल्यात जखमी झालेल्या प्रशांत महादेव शेंडगे (वय २४, मुळ रा. शिवडे, ता.कराड) याच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वराडे गावच्या हद्दीत सागवानाच्या शेतामध्ये बुधवारी रात्री प्रशांत शेंडगे हा युवक जखमी स्थितीत आढळून आला होता. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला उपचारार्थ रुग्णालयात दाखल केले. तसेच पोलीस अधिक्षक समीर शेख, अप्पर अधिक्षक वैशाली कडूकर, उपअधीक्षक अमोल ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप, अरुण देवकर, सहाय्यक निरीक्षक किरण भोसले, अशोक भापकर, रवींद्र भोरे, अमित बाबर, रोहित पारनेर, सत्यवान पाटील, विश्वास शिंगाडे यांच्यासह कर्मचाऱ्यांची चार पथके तयार करून या गुन्ह्याच्या तपासाला सुरुवात करण्यात आली. पोलिसांनी माहिती घेतली


**पान नं.४ वर...**

| हवामानाचा अंदाज | | |
|---|---|---|
| ठिकाण | किमान | कमाल |
| सातारा | २२ | २० |
| सांगली | २१ | २० |
| कोल्हापूर | २२ | २१ |
| पंढरपूर | २१ | २० |
| सोलापूर | २२ | २१ |

# वाळू माफियांना मदत करणारे पोलिस कर्मचारी निलंबीत

**बीड,दि.३१(वृत्तसंस्था)**
बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड पोलिस चांगलेच चर्चेत आले आहेत. नवे पोलिस अधीक्षक नवनीत कावंत यांनी सुत्रे हाती घेताच नवीन बदल केले आहेत. आता अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरोधात त्यांनी मोठी कारवाई केली आहे. आता वाळू माफियांना मदत करणाऱ्या पोलिसांवर त्यांनी कारवाई केली आहे.

अवैध वाळू उपसा केल्या प्रकरणात आरोपींसोबत साटेलोटे करणाऱ्या बीडच्या गेवराई पोलिस ठाण्यातील दोन पोलिस



कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे. पोलिस अधिक्षक नवनीत कावंत यांनी ही कारवाई केली आहे. गेवराई येथील पोलिस ठाण्यातील सहाय्यक फौजदार बलराम सुतार आणि पोलिस हवालदार अशोक हंबर्डे यांच्यावर कारवाई केली आहे.

## चिमटा.ऽ..ऽ...ऽ




प्रगतीचा पाया हा विश्वासावरती अवलंबून आहे....

# संतोष देशमुख प्रकरणातील पुरावे सार्वजनिक करा:प्रकाश आंबेडकर

**अकोला,दि.३१(वृत्तसंस्था)**



महाराष्ट्रात सध्या बीड जिल्हा चांगलाच चर्चेत आहे. तिथे होणाऱ्या प्रत्येक घटनेवर सर्वांचे लक्ष लागले आहे. सकाळीच भगवान गडाचे महंत नामदेवशास्त्री यांनी पत्रकार परिषद घेत आपण मंत्री धनंजय मुंडे यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहोत, असे जाहीर केले आहे. यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले, भगवान गडाने धनंजय मुंडे यांना दिलेला पाठिंबा ही सामाजिक बाब आहे.

मस्साजोग सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील पुरावे पोलिसांनी सार्वजनिक करावेत. असे केले तरच या संदर्भातील लोकांच्या मनातला संभ्रम दूर होणार आहे असे मत प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले आहे. प्रकाश आंबेडकर यांनी आजच्या तरुण पिढीबद्दल चिंता व्यक्त करत भाष्य केले आहे. आजची पिढी विचार करत नसून ती आत्मकेंद्रित झाली आहे, असे विधान त्यांनी केले आहे. अकोला येथील सीताबाई कला, वाणिज्य आणि विद्यान महाविद्यालयात एका राष्ट्रीय परिसंवाद कार्यक्रमात प्रकाश आंबेडकर बोलत होते. भारतीय संविधान देशाच्या नवीनतम सर्वांगीण विकासाचा पाया असा या परिसंवादाचा विषय होता.

प्रकाश आंबेडकर यांनी या कार्यक्रमात बोलताना अनेक विषयांवर भाष्य केले आहे. यावेळी बोलताना त्यांनी अमेरिकेत ट्रॅम्प सरकारच्या धोरणांमुळे जवळपास २३ लाख भारतीयांना देशात परत यावे लागणार असल्याची भीती देखील प्रकाश आंबेकडर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली आहे. पुढे बोलताना प्रकाश आंबेकडर म्हणाले, ब्रह्मपुत्रा ही ईशान्येतील सेव्हन सिस्टर आणि वन ब्रदर यांना जोडणारी नदी आहे. मात्र याच नदीवर चीन सात धरणे बांधायची योजना आखत आहे. ही सात धरणे बांधली गेली तर ब्रह्मपुत्रेचे पाणी आपल्याला मिळणार नसल्याचे नाही. असे झाले तर ईशान्येतील सात राज्य चीनसोबत जाण्याचा विचार करू शकतात, अशीही चिंता प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली आहे.

# शहीद जवान चंद्रकांत काळे यांच्या पार्थिवावर वडूज येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**सातारा,दि.३१(प्रतिनिधी)**
शहीद वीर जवान चंद्रकांत काळे यांच्या पार्थिवावर आज खटाव तालुक्यातील वडूज येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

अंत्यसंस्काराच्या ठिकाणी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार प्रभाकर घार्गे, दिलीप येळगावकर, प्रांताधिकारी उज्वला गाडे, प्रभाकर देशमुख ,,तहसीलदार बाई माने, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सतीश हंगे यांनी पुष्पचक्र वाहून



**शहीद वीर जवान चंद्रकांत काळे यांच्या पार्थिवास अभिवादन करताना ना.जयकुमार गोरे व इतर**

मानवंदना दिली.

पोलीस व सैन्य दलाच्या जवानांच्या तुकडीने हवेमध्ये बंदुकीच्या फैरी झाडून आणि बँडपथकातर्फे अंतिम

**पान नं.४ वर...**

## सुविचार

वाईट विचारांचे गवत नेहमी आपोआप उगवते...
चांगल्या गोष्टी नेहमी पेराव्याच लागतात...

## संपादकीय

# गंगेतले निष्पापांचे रक्त

यंदाचा प्रयागराज इथला कुंभमेळा सर्वच अर्थांनी विक्रमी आहे. जगातल्या कोणत्याही धार्मिक किंवा इतर कार्यक्रमांमध्ये इतके नागरिक एकत्र येण्याचा प्रसंग कधीही आला नव्हता. अनेक कोटी भाविक एकत्र येणाऱ्या या मेळ्यात केंद्र आणि उत्तर प्रदेश सरकारने केलेल्या व्यवस्था काही प्रमाणात का होईना असफल, अयशस्वी ठरून किमान तीस भाविक मृत्युमुखी पडले आहेत. यंदाचा प्रयागराज इथला कुंभमेळा सर्वच अर्थांनी विक्रमी आहे. जगातल्या कोणत्याही धार्मिक किंवा इतर कार्यक्रमांमध्ये इतके नागरिक एकत्र येण्याचा प्रसंग कधीही आला नव्हता. अनेक कोटी भाविक एकत्र येणाऱ्या या मेळ्यात केंद्र आणि उत्तर प्रदेश सरकारने केलेल्या व्यवस्था काही प्रमाणात का होईना असफल, अयशस्वी ठरून किमान तीस भाविक मृत्युमुखी पडले आहेत. दुपटीहून अधिक जखमी झाले आहेत. हा आकडा खरा आहे का किंवा तो वाढू शकतो का, याबद्दल काहीही सांगणे शक्य नाही. मात्र, तीस भाविकांचा मृत्यू हे योगी सरकारचे, सगळ्या यंत्रणांचे आणि भक्तांचेही अपयश आहे. कुंभमेळ्यात याआधीही दुर्घटना घडून शेकडो लोकांनी प्राण गमावले आहेत. १९५४ मध्ये त्यात जवळपास ८०० लोकांचा मृत्यू झाला होता. हे सारे पाहता, मुळात प्रयागराज या स्थानाची एकूण क्षमता लक्षात घेऊन उत्तर प्रदेश सरकारने जाहिरातींचा मर्यादित राष्ट्रव्यापी मारा करायला हवा होता. योगी सरकारला जगातला सर्वांत मोठा धर्मोत्सव यशस्वी करून दाखविण्याची एक प्रकारची झिंग चढली होती. कृत्रिम प्रज्ञेसहित सर्व अत्याधुनिक यंत्रणा, साधनांचे उपयोजन केल्याचे सांगितले जात होते. कागदोपत्री ते सारे आखीव-रेखीव दिसत होते. शंकेला जागा नव्हती. आयोजनात हजारो कोटी रुपये ओतले होते. तरीही ही दुर्घटना झाली. याचे मुख्य कारण, केवळ प्रचंड बांधकामे, रस्ते, तंबू किंवा सोयी उभारून भागत नाही. या साऱ्यांचा वापर करणाऱ्या भाविकांची मनोभूमिकाही तशी असावी लागते. ती तशी नसेल तर काय होते, याचे प्रत्यंतर या संकटातून आले आहे. मध्यरात्री एक वाजता त्रिवेणी स्नानासाठी झपाट्याने वाट कापणारा तरुणांचा एक गट वाटेवरती झोपलेल्या शेकडो लोकांना तुडवत पुढे गेल्याचे काही जणांनी सांगितले आहे. अशा या निर्घृण वर्तनामुळेच मृत आणि जखमींमध्ये महिलांचे प्रमाण किती तरी अधिक आहे. पुण्य म्हणजे काय आणि ते कसे मिळवायचे असते; याचा कसलाच विवेक न बाळगता बेछूट वागणाऱ्या या तथाकथित धार्मिकांना 'पुण्य पर उपकार, पाप ते परपीडा..' ही तुकोबांची उक्ती माहीत असण्याची शक्यता नाहीच. मुळात एकदा कुंभमेळा सुरू झाल्यानंतर अमुकच तिथीला, अमुकच वेळेला, अमुकच जागी 'पवित्र स्नान' करायलाच हवे; या भावनेला सात्त्विक श्रद्धा का म्हणत नाहीत, याचे अगदी धर्ममान्य उत्तर माहीत असणारे अनेक महापंडित कुंभमेळ्यात असतील. गंगेच्या किनाऱ्यावर राहूनही काम सोडून गंगास्नानासाठी न जाणाऱ्या आणि 'मन चंगा तो कठौती में गंगा..' असा उपदेश करणाऱ्या संत रविदास यांचे आपल्या सगळ्यांनाच इतके विस्मरण व्हायलाच हवे का? उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी यंदाचा कुंभमेळा हा मेगा इव्हेंट करायचा चंग बांधला आणि त्यांना त्यातून उत्तर प्रदेशाच्या अर्थकारणाला बळ द्यायचे आहे. या निमित्ताने होणारी दोन लाख कोटी रुपयांची उलाढाल ही मोठी रक्कम आहे. मात्र, असे धर्माधिष्ठित अर्थकारण साधताना निरपराध माणसांचे असे बळी देऊन समृद्धीचे इमले चढविणे योग्य आहे का? इतकी मोठी दुर्घटना होऊनही 'इतर कुंभमेळा कसा छान चालू आहे...' हे सांगण्याची जणू स्पर्धा चालू आहे. रुग्णालयात अनेक जखमी आयसीयूमध्ये मृत्यूशी झुंज देत असताना साडेसात कोटी भाविकांनी कसे स्नान केले, या आकड्यातच आपल्याला समाधान वाटत असेल तर मुळातूनच काही तरी गंभीर गफलत होते आहे. अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी केलेल्या व्यवस्थेमुळे, काही पूल बंद केल्याने साराच ताण वाढला, असे सांगितल्यावर 'तसे काही नाही..' असा खुलासा योगी सरकारने केला होता. मात्र, आता अनेक नवे निर्बंध लागू केले असून त्यात व्हीआयपींसाठीची खास व्यवस्था स्थगित केली आहे. या व्हीआयपी संस्कृतीने देश जागोजाग पोखरून काढला आहे. निष्पाप भाविकांच्या मृत्यूलाही हीच संस्कृती काही प्रमाणात जबाबदार आहे. अशी दुर्घटना घडल्यानंतर नटनट्या व इतर लब्धप्रतिष्ठितांनी खरे तर गंगास्नानाचा आग्रह सोडायला हवा होता. कारण त्यांच्या सुरक्षेमुळे सामान्य भाविकांना अधिक त्रास होतो. मात्र, तेवढेही शहाणपण अनेकांना सुचले नाही. अशा धार्मिक स्थळी मृत्यू होतो, तेव्हा मृतांना मोक्षच मिळाला; अशा प्रकारची असंवेदनशील वक्तव्ये पूर्वीही केली गेली आहेत. याही वेळा काहींनी ती केली. तशी करणे हा या मृतांचा एक प्रकारे अपमान आहे. अशा घटना झाल्यावर माध्यमे त्याकडे जितके दुर्लक्ष करतील, तितके बरे, असे सगळ्याच सरकारांना वाटते. पण असे कसे होईल? आता कुंभमेळ्याचा उर्वरित काळ विनाव्यत्यय पार पडावा आणि सगळ्यांच संबंधितांनी या आपत्तीमधून योग्य तो धडा शिकावा, हीच अपेक्षा आहे.

**'कर्मयोगी'** हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक नंदकुमार ज्ञानेश्वर लोखंडे** यांनी हर्षद प्रिंटर्स अॅन्ड पब्लिशर्स,बनवडी पो.पार्ले, ता.कराड, जि.सातारा येथे छापून दैनिक कर्मयोगी कार्यालय ११६,श्रध्दा कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड,बुधवार पेठ, कराड ४१५११० जि.सातारा (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. **संपादिका सौ.मंगल नंदकुमार लोखंडे** ***कार्यकारी संपादक - खंडू इंगळे** *पीआरबी अॅक्ट १८६७ नुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील. **RNI NO-MAHMAR/2001/3806**

**Karmayogi,** Printer, Publisher and Owner **Nandkumar Dnyaneshwar Lokhande** Printed at Harshad Printers And Publishers, Banawadi Post-Parle Tal-Karad Dist-Satara (MS) And Published at Daily Karmayogi Karyalay, 116, Shrdha Complex, Station Road, Budhawar Peth, Karad 415 110 Dist-Satara (MS) Editor **Mrs.Mangal Nandkumar Lokhande** *Exceutive Editor **Khandu Ingale** *PRB Act 1867 Editorial Responsibility **RNI NO-MAHMAR/2001/3806**

**Email - karmyogi2008@gmail.com**

**मुख्य कार्यालयः** ११६,श्रध्दा कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, बुधवार पेठ, कराड. ४१५११० (मोबा.९३२६१३३७३१) सातारा प्रतिनिधी :८४२१८२२५०० सोलापूर कार्यालय:(मोबा.९३७१८०७१४५) कोल्हापूर शहर कार्यालय-संपर्क (मोबा.९२२५८१२४२४). पंढरपूर शहर कार्यालय-संपर्क (मोबा.९०२८३४६४१५).

# पांचगणी गिरीस्थान नगरपरिषद, पांचगणी

### पांचगणी, ता.महाबळेश्वर, जि.सातारा

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५

कलम ३ अन्वये नगरपालिका (क) वर्ग यांनी जाहीर करावयाच्या लोकसेवेचा तपशील

संदर्भ -

१. सन-२०१५ चा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम
२. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४, दि. २३ जून २०१५
३. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२०, दि. ०४ सप्टेंबर २०१७
४. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२०, दि. २६ ऑगस्ट २०१९
५. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२०, दि. २९ जानेवारी २०२१
६. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-३२, दि. ३० सप्टेंबर २०२२
७. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-३२, दि. १५ डिसेंबर २०२२
८. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-३२, दि. ०९ जानेवारी २०२४

| अ.क्र. | लोकसेवेची सूची | आवश्यक कागदपत्रे | न.पा.मार्फत आकारली जाणारी फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | नक्कल फी रू.५०/- व शोधनवळ फी चालू वर्ष सोडून (प्रति वर्ष) रू.१०/- | ०३ दिवस | जन्म-मृत्यू नोंदणी विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २ | मृत्यू प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | नक्कल फी रू.५०/- व शोधनवळ फी चालू वर्ष सोडून (प्रति वर्ष) रू.१०/- | ०३ दिवस | जन्म-मृत्यू नोंदणी विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | १) विहित नमुन्यातील फॉर्म-ड<br>२) प्रतिज्ञापत्र /रू१००/- चे कोर्ट फी स्टॅम्प<br>३)जन्म दाखला/रेशनकार्ड /रहिवास पुरावा / वधू-वराचे प्रत्येकी ४- आयकार्ड फोटो / लाईटबिल /फोनबिल /पासपोर्ट कॉपी<br>४) ३ साक्षीदार त्यांचे प्रत्येकी १ आयकार्ड फोटो/ रहिवास पुरावा /व ओळखपत्र | १.९०दिवसापर्यंत रु. २५०/-<br>२.एक वर्षाच्या आत रु.३५०/-<br>३. एक वर्षानंतर रु.५००/- | ०३ दिवस | विवाह नोंदणी विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४ | मालमत्ता कर उतारा देणे | विहित नमुन्यातील अर्ज | रू.५०/- | ०३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ५ | कराची थकबाकी नसल्याचा दाखला देणे | विहित नमुन्यातील अर्ज | रू.१००/- | ०३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ६ अ | दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १) विहित नमुन्यातील अर्ज व इतर आवश्यक कागदपत्रे २) थकबाकी नसल्याचा दाखला ३) दस्तऐवजाची प्रत (खरेदीखत/ बक्षिसपत्र/ वाटणीपत्र व इतर ) | खरेदीखत/ बक्षिसपत्र/ वाटणीपत्र असल्यास खरेदीखत/ बक्षिसपत्र/ वाटणीपत्र मुल्याच्या१% | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ६ ब | वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १) विहित नमुन्यातील अर्ज २) थकबाकी नसल्याचा दाखला ३) हस्तांतरण फॉर्म ४) वारस हक्क प्रमाणपत्र | वारस नोंद असल्यास रु.१०००/- | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ७ | झोन दाखला देणे | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) ७/१२उतारा /सिटी सर्वे उतारा<br>३) मोजणी नकाशा /सिटी सर्वे नकाशा | रु.१०००/- | ०७ दिवस | नगररचना विभागप्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ८ | भाग नकाशा देणे | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) ७/१२ उतारा /सिटी सर्वे उतारा<br>३) मोजणी नकाशा /सिटी सर्वे नकाशा | प्रति A-४ साईज कृष्णधवल रु.३००/- प्रति A-४ साईज रंगीत रु.५००/- | ०३ दिवस | नगररचना विभागप्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ९ | बांधकाम परवाना देणे | १) विहित नमुन्यातील अर्ज २) वास्तूविशारादाचा दाखला ३)मालकी हक्काची कागदपत्रे ४)बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रति ५) मोजणी नकाशा ६) मंजूर रेखांकणाची प्रत | बाजार मूल्य तक्त्यावर अवलंबून | ३० दिवस | नगररचना विभागप्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १० | जोते प्रमाणपत्र देणे | १)विहित नमुन्यातील अर्ज<br>२)बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र | रु.५०/- प्रति चौ.मि. | ०७ दिवस | नगररचना विभागप्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ११ | जलनिस:रण जोडणी देणे | १)विहित नमुन्यातील अर्ज<br>२) जागा मालकीची कागदपत्रे<br>३)प्रतिज्ञापत्र<br>४) थकबाकी नसल्याचा दाखला | १) रहिवास कारणासाठी रु.२०००/-<br>२)वाणिज्य कारणासाठी रु ५०००/- | १५ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १२ | भोगवटा प्रमाणपत्र देणे | १) विहित नमुन्यातील अर्ज २)बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र ३) जोते प्रमाणपत्र ४) घर मालक / वास्तूविशारद यांचे पूर्णत्वाचे स्वयंघोषणा | रु .१००० | ०८ दिवस | नगररचना विभागप्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १३ | नवीन कर आकारणी | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. भोगवटा प्रमाणपत्र | - | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १४ | पुन: कर आकारणी | विहित नमुन्यातील अर्ज | - | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १५ | कराची मागणीपत्र तयार करणे | विहित नमुन्यातील अर्ज | - | ३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १६ | करमाफी मिळणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | - | ७ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १७ | स्वयंमुल्यांकन | विहित नमुन्यातील अर्ज | - | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १८ | आक्षेप नोंदविणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२.थकबाकी नसल्याचा दाखला | - | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १९ | उपविभागामध्ये मालमत्ता विभाजन | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३.मालकी हक्काची कागदपत्रे (खरेदीखत/ बक्षिसपत्र/वाटणीपत्र व इतर) | - | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २० | मालमत्ता पडणे व पुनःबांधणी आकारणी | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | - | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २१ | व्यापार/ व्यवसाय/साठा करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणे | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | २०००/- | ७ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २२ | मंडपासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. रस्ता पुनर्स्थापन करार | १.५०/- प्रति चौ. फुट, २.न.पा. चे जागेवर प्रति दिन १००/- प्रति दिन | १५ दिवस | बांधकाम विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |

| अ.क्र. | लोकसेवेची सूची | आवश्यक कागदपत्रे | न.पा.मार्फत आकारली जाणारी फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २३ | नवीन परवाना मिळणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | १०००/- | १५ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २४ | परवाना नुतनीकरण | १. योग्य प्रकारे भरलेलेअर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | - | १५ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २५ | परवाना हस्तांतरण | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | - | १५ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २६ | परवाना दुय्यम प्रत | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | - | १५ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २७ | परवाना भागीदाराचे नाव बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | - | १५ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २८ | भागीदारांच्या संख्येत बदल (वाढ/कमी) | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज | - | १५ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २९ | परवाना रद्द करणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज | - | १५ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३० | कालबाह्य परवानासाठी नुतनीकरण सुचना | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | - | १५ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३१ | नवीन जाहिरात/आकाश चिन्ह परवाना व परवाना नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित न.प.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | १. खाजगी जागेमध्ये २०/- प्रति चौ.मी. प्रति दिन २.इतर ठिकाणी ३०/- प्रति चौ.मी.प्रति दिन. | १५ दिवस | नगररचना विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३२ | नवीन सिनेमा चित्रीकरण परवाना व परवाना नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित न.प.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | १.रु.१००००/- प्रति दिन खाजगी मालमत्तेमध्ये २.रु.२००००/-प्रति दिन न.पा. मालकीच्या जागेमध्ये | १५ दिवस | बांधकाम विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३३ | व्यवसाय परवाना स्वयंनुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज २. संबंधित न.प.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | - | १५ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३४ | रस्ता खोदाई परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज २. संबंधित न.प.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र ३.शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | रु.२०००/- प्रती चौ.मी. | ३०दिवस | बांधकाम विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३५ | राज्य खाद्य परवान्याकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा नाहरकत दाखला | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.संबंधित न.प.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र ३.ज्या इमारतीत सदर आस्थापना / कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे ४.शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | ५००/- | ३० दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३६ | खाद्य नोंदणी प्रमाणपत्राकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा आरोग्यविषयक नाहरकत दाखला | १.विहित नमुन्यातील अर्ज २.संबंधित न.प.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र ३.ज्या इमारतीत सदर आस्थापना /कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे ४. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | ५००/- | ३० दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३७ | लॉजिंग हाउस परवाना देणे | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | ५०००/- | ३०दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ३८ | लॉजिंग हाउस परवान्याचे नुतनीकरण करणे | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | - | ३०दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ३९ | मंगल कार्यालय/सभागृह वगैरे परवाना देणे. | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | - | ३०दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ४० | मंगल कार्यालय/सभागृह वगैरे परवान्याचे नूतनीकरण करणे | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | - | ३०दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ४१ | फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | - | १५ दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ४२ | भूमिगत दूरसंचार वाहिनी (ऑपटीकल फायबर नेटवर्क केबल) टाकण्याकरिता परवानगी देणे | १.विहित नमुन्यातील अर्ज २.नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण२०२१/C.R.२४२/U.D.-२० दि.१९/१२/२०२२ मधील schedulc III नुसार आवश्यक कागदपत्रे ३.शासन वेळोवेळी विहित करील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | - | ६०दिवस | मुख्याधिकारी | जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय दूरसंचार समिती | प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग व अध्यक्ष, राज्यस्तरीय दूरसंचार समिती |
| ४३ | रस्त्यावरील खड्डे बुजविणे | पुराव्यासह अर्ज<br>उदा. जिओ टॅग केलेले फोटो इत्यादी | - | ५ दिवस | बांधकाम विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४४ | गटरावरील झाकणे सुस्थितीत ठेवणे | पुराव्यासह अर्ज<br>उदा.जिओ टॅग केलेले फोटो इत्यादी | - | ५ दिवस | बांधकाम विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४५ | शहरात स्वच्छता ठेवणे | पुराव्यासह अर्ज<br>उदा.जिओ टॅग केलेले फोटो इत्यादी | - | १ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४६ | मोबाईल टॉवर परवाना | १. विहित नमुन्यातील अर्ज २. माहिती तंत्रज्ञान विभागाने दिलेला परवाना ३. संबंधित इमारतीच्या मालकी हक्काचा पुरावा. ४.भाडेकरारनामा ५.स्थळाचा नकाशा (१:१०००) ६. ज्या इमारतीवर टॉवर उभारायचा आहे त्याचे वैध भोगवटा प्रमाणपत्र ७. संबंधित इमारतीच्या /जमिनीच्या मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र ८.सक्षम प्रधीकाऱ्याचे संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र ९. पर्यावरण विभागाची ना हरकत १०. संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना -देय प्रमाणपत्र ११. सक्षम प्राधिकारी यांचा अग्निशमन ना हरकत दाखला १२. शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक परवाने/दस्तऐवज | १००००/- | ६० दिवस | नगररचना विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |

शिक्का

सही/-
(निखील जाधव)
प्रशासक तथा मुख्याधिकारी
पांचगणी गिरीस्थान नगरपरिषद, पांचगणी

# मुलाचे मालक होवू नका त्यांचे पालक व्हा:इंद्रजित देशमुख

## बनवडी येथे पालक उद्‌बोधन कार्यशाळा




**बनवडी येथील पालक उद्‌बोधन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना इंद्रजित देशमुख यावेळी डॉ.शंकरराव खापे**

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.३१**

मुलामध्ये कोणते गुण आहेत.याचे निरीक्षण करुन त्याच क्षेत्रात त्याचे भविष्य घडवा.त्याच्यावर तुमचे निर्णय लादू नका.त्यांच्यार नरागवता त्यांना प्रेमाची शिक्षा करा. आई वडिलाचे मुले निरक्षण करतात.हुकमशाही पध्दतीने त्याच्या बाबतीचे निर्णय नघेता लोकशाही पद्धतीने घेतले पाहिजेत.त्यांचे मालक होवू नका तर त्यांचे सुजान पालक बना असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी व शिवम प्रतिष्ठान घारेवाडीचे इंद्रजित देशमुख यांनी केले.

बनवडी (ता.कराड) येथील जागृती विद्यामंदिर व संजिवनी प्राथमिक शाळा यांच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित पालक उद्‌बोधन कार्यशाळेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शंकरराव खापे होते. यावेळी उपाध्यक्ष किशोर पाटील तसेच संस्थेचे पदाधिकारी मुख्याध्यापक शिक्षक पालक, विद्यार्थी, आदिंची उपस्थिती होती.

यावेळी देशमुख पुढे म्हणाले, जी मुले मोठ्यांचा आदर करतात आणि लाहानांची कदर ठेवतात तीच मुले संस्कारक्षम असतात. मुलांना विश्वासात घेतल्यास ती आयुष्यभर विश्वासाने राहातील.मोबाईल हा राक्षस असून पुढची पीढी तो खात चालला आहे.त्याच्या वापरायचे वेळापत्रक तयार करा पालकांनी वर्तमान आणि भविष्यात जगले पाहिजे. यावेळी डॉ शंकरराव खापे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन एस.व्ही.शिंदे यांनी केले.तर बी.बी. कोठावळे यांनी आभार मानले.

# सगाम महाविद्यालयात प्लॅनेट परेड २०२५ चे आयोजन



**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.३१**

सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालयातील पदार्थ विज्ञान विभागामार्फत दिनांक २२ ते २७ जानेवारी दरम्यान आकाश दर्शनाच्या माध्यमातून प्लॅनेट परेडचे आयोजन करण्यात आले होते. सेलेस्ट्रॉन नेकस्टार या आठ इंची दुर्बिणीच्या साह्याने आकाश दर्शनाची संधी उपलब्ध करून देण्यात आली प्लॅनेट परेड म्हणजेच ग्रहांचे सरेखन ही खगोलीय घटना १४४ वर्षातून घडली गेली या परेडचे निरीक्षण सायंकाळी ७.३० ते रात्री १०.३० या वेळेत करण्यात आले. यावेळी अवकाशात शुक्र, शनी, मंगळ व गुरू या ग्रहांचे दर्शन झाले. गुरु व गुरुचे सहा आग्रह ठळकपणे पाहता आल्यामुळे विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत झाला.

कराड शहर व विशेषत: विद्यानगर परिसरातील १५०० हून अधिक विद्यार्थी, पालक, शिक्षक व खगोलप्रेमींनी या दुर्मिळ संधीचा लाभ घेतला. प्लॅनेट परेडचे समन्वयक डॉ. नामदेव हारळे यांनी प्लॅनेटसंबंधी माहिती देऊन विद्यार्थ्यांच्या अनेक शंकांचे निरसन केले, तसेच त्यांनी अवकाश ज्ञानाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल जागृत केले.

पदार्थ विज्ञान विभागाच्या मदतीने स्काय ऑब्सव्हेटरी हे सेंटर विकसित करण्याचा मानस असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन राजमाने यांनी प्रत्यक्ष भेटीदरम्यान सांगितले. येथून पुढे घडणाऱ्या विशेष खगोलीय घटना विद्यार्थ्यांपुढे प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे उपलब्ध करून देण्याची ग्वाही विभागप्रमुख प्रा.डॉ.जे. बी. थोरात यांनी दिली.या प्लॅनेट पर्यटनासाठी भौतिकशास्त्र विभागातील प्रा.डॉ.सुनंदा पिसाळ, प्रा.अक्षय घोरपडे, प्रा.गौरव गायकवाड, प्रा.इंद्रजीत ढोले व प्रा.संध्या टिके यांनी मदत केली.

यावेळी रयत विज्ञान परिषदेचे डॉ.सुधीर कुंभार व राजेंद्र कदम यांनी खगोलशास्त्रीय विस्तृत माहिती दिली.याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.एस.ए.पाटील, प्रा.डॉ.यु.बी.मोरे यांनीही उपस्थित राहून आकाशदर्शनाचा आनंद घेतला.

# बेटी बचाव बेटी पढाओ योजनेच्या १० वर्ष पुर्तीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे:नागेश पाटील

**सातारा,दि.३१(प्रतिनिधी)**

बेटी बचाव बेटी पढाओ योजनेला १० वर्षे पूर्ण झालेली आहेत. या निमित्ताने जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे ८ मार्च पर्यंत आयोजन करावे, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीला जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विजय तावरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

महिला हेल्प लाईन-१८१ आणि चाईल्ड हेल्प लाईन-१०९८ चे शैक्षणिक कार्यक्रम आणि प्रचार प्रसिध्दी जनजागृती करावी तसेच वृक्षारोपण, महिला पोलीस कर्मचारी व इतर विभागाच्या महिला कर्मचाऱ्यांची बाईक, सायकल रॅली, सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० योजने अंतर्गत किशोरवयीन मुलींसाठी जनजागृती मोहिम आणि नाव नोंदणी मोहिम, मानसिक आरोग्याबाबत जागरुकता मोहिम, शासकीय कार्यालयांना भेटी, भारतीय न्याय संहितेमध्ये महिलांसाठीच्या तरतुदी जनजागृती यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचेही निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी पाटील यांनी दिल्या.

शासनाच्या आलेल्या निर्देशाची व उपक्रमांची माहिती महिला व बाल विकास अधिकारी तावरे यांनी बैठकी दिली.

# कराडमध्ये ९ रोजी रस्ता सुरक्षा मॅरेथॉन

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.३१**

रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत रस्ता सुरक्षिततेे संदर्भात जनमाणसामध्ये जागरूकता निर्माण व्हावी, या हेतूने रस्ता सुरक्षा मॅरेथॉन (दौड) रविवार दि.९ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आली असल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी चैतन्य कणसे, सामाजिक कार्यकर्ते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे समर्थक रणजीतनाना पाटील व अतुल पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कराड उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) व रणजीतनाना पाटील मित्र परिवार यांच्यावतीने ही मॅरेथॉन प्रायोजित करण्यात आली आहे.



रविवारी सकाळी सात वाजता लिबर्टी मजदूर मंडळ येथून स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. स्पर्धेमध्ये जवळपास अडीच हजार स्पर्धकांचा सहभाग असणार आहे. नोंदणीसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

या स्पर्धेचा मार्ग लिबर्टी मैदान, छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमपासून सुरु होऊन विजय दिवस चौक, बसस्थानक, दत्त चौक, मुख्य बाजारपेठ, चावडी चौक, कन्या शाळा इथून पुढे कृष्णा नाकामार्गे कॉटेज हॉस्पिटल इथून पुढे विजय दिवस समारोह चौक व पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम, लिबर्टी मैदान कराड येथे ही स्पर्धा संपेल.

सदरची स्पर्धा पुरुष व महिला अशा दोन गटात असेल. सदरच्या

**आमचे गुरुवर्य एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राचे कॉमन मॅन मुख्यमंत्री म्हणून ओळख निर्माण केली आहे. त्यांचा वाढदिवस रस्ता सुरक्षा दौड पूर्ण करून साजरा करण्यात येणार आहे. खेळाडू, नागरिक व महिलांनी ९ फेब्रुवारीच्या मॅरेथॉनमध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा.**

**-रणजीतनाना पाटील**

स्पर्धेसाठी नाव नोंदणी करण्याचे आवाहन रणजीत पाटील नाना मित्रपरिवार यांनी केले आहे. या स्पर्धेमधील सर्व सहभागी खेळाडूंना टी-शर्ट, मेडल व नाश्ता दिला जाणार आहे.

स्पर्धेच्या दिवशी सकाळी पाच ते सात यावेळेत खेळाडूंना टी-शर्ट व नाश्ता दिला जाईल. त्यानंतर झुंबा सेशन होईल व मुख्य स्पर्धेत सुरुवात होईल. या स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविले जाईल. या स्पर्धेसाठी शासकीय अधिकारी कर्मचारी त्याचबरोबर सर्व खेळाडू, नागरिक सहभागी असणार आहेत.तरी सर्वांनी स्पर्धेच्या अगोदर एक दिवसापर्यंत आपली नाव नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन उपप्रादेशिक कार्यालय कराड व रणजीतनाना पाटील मित्र परिवार कराड यांनी केले आहे.

नाव नोंदणीसाठी पुढील ठिकाणी संपर्क करावा. संगम हेल्थ क्लब मुरली वत्स-७२१८१२२७२२, ए.पी.स्पोर्ट्स ९७६६३२३८७८, आरटीओ ऑफिस योगेश कुंभार-९७३०६३२११४, लिबर्टी मजदूर मंडळ-९६०४९४८५८४, ९९७०६३९८७७, शिवराय प्रतिष्ठान-७५२२९२७५५५.

पान नं.१ वरून...

## प्रियकराच्या मदतीने आईनेच...

असता प्रशांत शेंडगे याच्या आईचे अनैतिक संबंध असल्यामुळे प्रशांत वारंवार वाद घालत होता. तसेच तो व्यसनाधीन असल्यामुळे आई शोभा हिने तिचा प्रियकर जयेंद्र जावळे याच्या मदतीने प्रशांतचा खून करण्याचा कट रचल्याचे पोलिसांच्या तपासातून निष्पन्न झाले.

जयेंद्र जावळे याने त्याचे साथीदार सिद्धार्थ व्हावळे आणि अकबर शेख या दोघांना मदतीला घेऊन प्रशांतला रिक्षाने उंब्रजमधून वराडे येथील शेतात आणले. त्याठिकाणी त्याला दारू पाजली. तसेच दगडाने ठेचून त्याचा खून करण्याचा प्रयत्न केला. प्रशांतला जखमी अवस्थेत सोडून ते तेथून पसार झाले होते. पोलिसांनी तातडीने या गुन्ह्याचा तपास करून चोवीस तासात चारही आरोपींना ताब्यात घेऊन अटक केले.

## वाद निर्माण करणे हा मराठी...

यांना विश्व मराठी साहित्य भुषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी फडणवीस म्हणाले, आठव्या शतकातील पुगलई माला नावाच एक पुस्तक असून त्यात मराठी माणसाचे विविध गुण आणि अवगुणा सुद्धा सांगितले आहेत. त्यात कलशिल नावाचा एक धडा असून मराठी माणसाला कल करायला आवडत असल्याचे लिहून ठेवले आहे. यामुळे वादासंदर्भात फार काळजी करण्याची गरज नाही. अशा प्रकारचे संमेलन करत राहायचे. कोणी नाव ठेवते, कोणी चांगल बोलतील, यातून चांगल मंथन होते आणि चांगल करण्याची शक्ती आणि बुद्धी मिळते.

जगच्या पाठीवर एकही असा देश नाही जिथे मराठी माणूस पोहचला नाही. जपान, अमेरिका गेलो तरी स्वागताला ते उपस्थित असतात. ५००, ८०० किलोमीटरचा प्रवास करुन मराठी माणसे दावोसला स्वागतासाठी आली होती. यावेळी लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी हे गाणे ऐकल्यावर आनंद झाला. मराठी माणूस इतक्या वर्षांपासून बाहेर असला तरीही माय मराठी त्याच्यापासून दुरावलेली नाही. त्यांच्या मनात मराठी असून पुढच्या पिढी पर्यंत पोहचविण्याचे काम करत आहेत. कुठेही गेलो तर पुन्हा येईन असे म्हटले जाते. अलिकडच्या काळात याला चांगले म्हणत आहेत. मागच्या काळात उपहासाने म्हणायचे. शेवटी एखाद्या शब्द चिकटला तर काळ आणि वेळे प्रमाणे त्याचे अर्थ बदलत जातात. जेव्हा जेव्हा विश्व संमेलन होईल त्यावेळी तुम्ही सर्वांनी पुन्हा येईल असे म्हणायला हवे.

## शहीद जवान चंद्रकांत काळे...

बिगुल वाजवून मानवंदना दिली. यानंतर तिरंगा ध्वज कुटुंबीयांकडे सुपुर्द करण्यात आला. वीरपत्नी मनीषा, आई किशाबाई, वडील महादेव, मुलगा श्रेयस, मुलगी श्रुती, भाऊ हिराचंद यांनी पार्थिवाचे अंतिम दर्शन घेतल्यानंतर मुलगा श्रेयस यांनी पार्थिवाला मुखाग्नी देऊन अंत्यसंस्कार केले.

यावेळी लष्कराचे विविध आजी, माजी अधिकारी, विविध विभागाचे अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# उद्योजक मधुकर सावंत यांना सेवाव्रती पुरस्कार जाहीर

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.३१**



सैदापूर-गोवारे येथील गजानन हाऊसिंग सोसायटी व श्री गजानन सेवा ट्रस्टतर्फे यंदा श्री गणेश जयंती उत्सवाचे आयोजन केले आहे. त्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, सोसायटीतील रहिवाशी व उद्योजक मधुकर सावंत यांना यावर्षीचा गजानन सेवाव्रती पुरस्कार जाहीर करण्यात आला असल्याची माहिती सोसायटीचे चेअरमन जयंत पाटील व ट्रस्टचे अध्यक्ष रोहित राव यांनी दिली.

तेम्हणाले, दरवर्षी गणेश जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यावर्षी शुक्रवार (दि.३१) सकाळी ११ वाजता अथर्वशीर्ष पठण व हळदी कुंकू कार्यक्रम होईल. दुपारी ४ वाजता सोसायटी व संलग्न वसाहती, कॉलन्यांमध्ये श्रींचा छबिना निघेल. शनिवार (दि.१) सकाळी ७.३० वचाजता श्री गणेश याग व आरती होईल. दुपारी साडेबारा १२.३० नंतर मंदिराजवळील गणेश उद्यानात महाप्रसादाचे आयोजन केले आहे. दुपारी ४ वाजता अंतर्नाद ग्रुपतर्फे संगीत गायन सेवा होईल. त्यानंतर सायंकाळी ६.३० वाजता पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम होईल.

उद्योजक सावंत यांना यावर्षीचा श्री गजानन सेवाव्रती पुरस्काराचे वितरण सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन राजमाने यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सायंकाळी ७.३० वाजता दिपमाळ प्रज्वलन व महाआरतीचे आयोजन केले आहे. सर्व कार्यक्रमांस उपस्थित राहण्याचे आवाहन ट्रस्टचे विश्वस्त, सोसायटीचे संचालकांनी केले आहे.

# पालीला ‘ब’ वर्ग पर्यटनाचा दर्जा

## पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांचा निर्णय:आ.मनोजदादा घोरपडे यांच्या पाठपुराव्याला यश

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.३१**

पाल (ता.कराड) येथील श्री खंडोबा देवस्थानास ब वर्ग दर्जा प्राप्त झालेला आहे. परंतु भाविकांना मूलभूत सुविधा देण्यासाठी ब वर्ग पर्यटन व्हावे यासाठी कराड उत्तरचे आ.मनोजदादा घोरपडे यांनी मागणी केली होती. त्या अनुषंगाने मंत्रालय येथे पर्यटन मंत्री ना.शंभूराज देसाई ,आ. मनोजदादा घोरपडे व पर्यटन विभागाचे सर्व अधिकारी यांची बैठक पार पडली. यामध्ये पाली गावास ब वर्ग पर्यटन क्षेत्र म्हणून तत्वता मान्यता देण्यात आलेली आहे.

कराड तालुक्यातील पाल हे श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान हे अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणून प्रसिद्ध आहे. या ठिकाणी दरवर्षी लाखो भाविकाच्यामध्ये यात्रा संपन्न होत असते. महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरातून भाविक मोठ्या प्रमाणावर येत असतात. परंतु, त्यांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी ग्रामपंचायत, देवस्थान ट्रस्ट



यांच्याकडे पुरेसा निधी उपलब्ध नसतो. पाल देवस्थानास ब वर्ग दर्जा प्राप्त असल्यामुळे देवस्थानाचा विकास करण्यासाठी निधी मिळतो. परंतु, गावातील विकासासाठी निधी मिळत नाही. यासाठी पाल गावचा ब वर्ग पर्यटनामध्ये समावेश व्हावा अशी मागणी कराड उत्तरचे आ.मनोजदादा घोरपडे यांनी पर्यटन विभागाकडे केली होती. त्यानुसार मंत्रालयामध्ये बैठक संपन्न झाली. यामध्ये पर्यटन मंत्री ना. शंभूराज देसाई यांनी पाल गावास तत्वतः ब वर्ग पर्यटनाचा दर्जा जाहीर केला असून एक महिन्याच्या आत शासन दरबारी प्रस्ताव पाठवून पूर्णतः पर्यटनाचा दर्जा देण्याचे मान्य केलेले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या एकात्मिक धार्मिक पर्यटन विकासाच्या अंतर्गत विकास आराखडा तयार करून लवकरच पाली गावचा कायापालट करणार असल्याचे आ.मनोजदादा घोरपडे यांनी सांगितले आहे. संपूर्ण पाली गावचा विकास आराखडा तयार करून पाल गाव हे रोल मॉडेल म्हणून विकसित करणार आहे. येणाऱ्या प्रत्येक भाविकास सर्व मूलभूत सुख-सुविधा उपलब्ध करण्यात येतील. त्यामुळे जास्तीत जास्त भाविक या ठिकाणी येऊन पर्यटनास चालना मिळेल व ग्रामपंचायत व महाराष्ट्र शासन यांचा सुद्धा महसूल वाढण्यास मदत होईल. या बैठकीस संग्राम घोरपडे, हिरामणी, प्रधान सचिव पर्यटन विभाग, व्यवस्थापकीय संचालक पर्यटन विभाग, संचालक पर्यटन विभाग, जिल्हाधिकारी सातारा, उपसचिव सांस्कृतिक विभाग, उपसंचालक प्रादेशिक पर्यटन अधिकारी आदी प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# आरोग्य क्षेत्रात इस्राईल येथे रोजगाराच्या संधी शिबीराचे आयोजन

**सातारा,दि.१(प्रतिनिधी)**

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत सातारा

जिल्ह्यातील उमेदवारांना इस्राईल येथे रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. या अनुषंगाने ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता कनिष्का नर्सिंग कॉलेज, पोलीस स्टेशन जवळ, सदर बझार, सातारा येथे आरोग्य क्षेत्रातील इस्राईल मधील रोजगार संधी या विषयी शिबीराचे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुनिल पवार यांनी दिली आहे.

इस्राईल मधील नॉन वॉर झोनमध्ये घरगुती सहाय्यक या क्षेत्रात युवक युवतींना रोजगाराची संधी आहे. इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या व २५ ते ४५ वर्षे वयोगटातील उमेदवार या योजनेमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत. सोबतच उमेदवारांकडे काळजीवाहू (घरगुती सहाय्यक) सेवांसाठी निपुण/पारंगत, भारतातील नियामक प्राधिकरणाद्वारे मान्यताप्राप्त असलेले व किमान ९९० तासांचा कोर्स पूर्ण केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे (ऑन जॉब ट्रेनिंग सह). भारतीय प्राधिकरणाद्वारे प्रदान केलेल्या मिडवाइफरी मधील प्रशिक्षण, संबंधित भारतीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली किवा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंट मधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक, तसेच जीडीए, एएनएम जीएनएम, बीएससी नर्सिंग, पोस्ट बीएससी नर्सिंगची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.

# मानव अधिकार संघटना कराड यांच्यावतीने मानव गौरव पुरस्कार उत्साहात

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.३१**

७६ वा प्रजासत्ताकदिन मानवाधिकार कराड शहराध्यक्ष नितीन शांतीलाल शाह, व डॉ.धनंजय खैर, सातारा जिल्हाध्यक्ष १६/१७ शुक्रवार पेठ विठ्ठल चौक कराड येथे साजरा करण्यात आला. या निमित्ताने मानव गौरव पुरस्कार समाजकार्य करणारे व्यक्तींना सन्मानपत्र शाल श्रीफळ गुलाबाचे फुल देऊन या कार्यक्रमांमध्ये डॉ अनिल शाह, भारतीय जनता पार्टी नेते विनायक पावसकर, सरकारी वकील राजेंद्र शाह,



विठ्ठल होमकर, विनायक गरुड, प्राचार्य अरुण कुंभार, पोलीस शशिकांत खराडे, पत्रकार कैलास थोरवडे, कराड नगरपरिषद कर्मचारी सुरेश शिंदे, या सर्वांना मानपत्र व शाल श्रीफळ गुलाबाचे फुल देऊन सत्कार करण्यात आला. तसेच या कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहणाऱ्या महिला शालिनी शाह, धनश्री रोकडे, कल्पना कदम, प्रीती शहा, जयश्री शाह, जोशना इनामदार, चंद्रकांत जिरंगे, सुधीर एकांडे, विनायक विभुते, सुहास चक्के, सागर मिरजकर, वकील आनंदा कुलकर्णी, दिनेश शहा, सुदेश देवाडिगा, संतोष पालकर, डूलेश्वर चव्हाण, कुमार शहा, मोहन गांधी, मनोहर जैन, अशोक भंडारी, जयवंत पोद्दार, गजानन भोपते, नारायण उपरे, भानुदास वास्के, अविनाश शहा, झानुर शेख, वाजिद मुल्ला, अमोल खाडे, जानू गडे, सूर्यवंशी सर, प्रमोद कुंभार, शरद गोंदकर, श्रीकांत इनामदार, सुनील शिंदे, नगरपरिषद मुकादम प्रवीण सुनील, खराडे सुरेश, पटेल संदीप, गनबावले दिलीप, वास्के बगाडे, उत्तम संतोष वास्के, प्रवीण शाह, तसेच व्यापारी मित्र मंडळ सामाजिक प्रतिष्ठित व्यक्ती व संपूर्ण नगरपरिषदेचे सहकार्यामुळे कार्यक्रम संपन्न झाला व नितीन शाहनी सर्व सत्कारमूर्तीचे उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले.

## लोकशाही दिनाचे ३ फेब्रुवारी रोजी आयोजन

**सातारा,दि.३१(प्रतिनिधी)**

माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये होणारा लोकशाही दिन हा सोमवार दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी कॉन्फरन्सहॉल, पहिला मजला, नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांनी दिली आहे.

# पोदारमध्ये अग्निशमन प्रक्रियेचे प्रात्यक्षिक

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.३१**

येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना अग्निशमन प्रक्रियेचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले.

शाळेमध्ये सर्वप्रथम अग्निसुरक्षा आराखड् ?यानुसार घेण्यात येणारी फायर ड्रिल आयोजन करण्यात आली. फायर अलार्म वाजताच सर्व विद्यार्थी शालेय मैदानात आले. अग्निशमन केंद्राकडून यावेळी उपस्थितांना अग्निशमन उपकरणे कशी वापरावीत तसेच आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यानंतर काय काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले.

यावेळी अग्निशमन दलाचे अधिकारी श्रीकांत देवघरे व विनोद कोटरे आणि कर्मचारी यांनी आग लागल्यानंतर घ्यावयाची महत्त्वाची काळजी, आग नियंत्रण कसे करावे, प्राथमिक मदत कशी करावी



याबाबत मार्गदर्शन केले. तसेच आणीबाणीच्या वेळी वापरण्यात येणारी विविध उपकरणे सादर केली. तसेच आग विझवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या पाण्याच्या नळींचे प्रात्यक्षिक दाखवले. आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन अधिकाऱ्यांशी संपर्क कसा साधावा हे मुलांना समजावून सांगितले. यावेळेस विद्यार्थ्यांनी अग्निशमन गाडीचा वापर कसा केला जातो, हे प्रत्यक्ष अनुभवले.

मॉक संपल्यानंतर विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसनही करण्यात आले.शाळेच्या उपप्राचार्या सौ.स्वाती नांगरे यांनी अग्निशमन दलाचे आभार मानले.

शाळेचे प्राचार्य अन्वय चिकाटे यांनी प्रात्यक्षिकानंतर शालेय शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी आग आणि इतर आपत्तींविषयी सजग राहण्याची आणि त्वरीत योग्य कृती करण्याचे महत्त्व सांगितले.

या संकटकालीन बचाव प्रशिक्षण यशस्वी होण्यासाठी शाळेचे प्राचार्य अन्वय चिकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्या सौ. स्वाती नांगरे, शाळेचे प्रशाकीय व्यवस्थापक विशाल जाधव, कार्यक्रमाच्या समन्वयिका सौ.मेघा पवार तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या प्रात्यक्षिकामुळे विद्यार्थ्यांमध्ये अग्निसुरक्षा आणि आपत्कालीन परिस्थितीच्या बाबतीत जागरूकता वाढली आहे.


**महाराष्ट्र शासन,**
**जलसंपदा विभाग**

**कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन यांत्रिकी व विद्युत पथक, ओगलेवाडी**
**ता.कराड, जि.सातारा, पिन-४१५१०५ यांचे कार्यालय,**
ई-मेल- tembhumeunit@gmail.com दुरध्वनी क्रमांक. ०२१६४-२७११४२

**ई-निविदा सूचना क्रमांक ११ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन यांत्रिकी व विद्युत पथक ओगलेवाडी कराड (दुरध्वनी क्रमांक ०२१६४/२७११४२) हे सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ "https://mahatenders.gov.in" येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन यांत्रिकी व विद्युत पथक, ओगलेवाडी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत रू.लक्ष |
|---|---|---|
| १ | टेंभू उपसा सिंचन प्रकल्प टप्पा क्र.१ ब येथील नादुरूस्त एच.टी.विद्युत मोटर्सचे रिवायडिंग करणे (१ नग) व डीइ व नॉन डीइ बेअरिंग बदलून ओव्हरहॉलिंग (९ नग), मोटर वायडींग टर्मिनल बुशिंग इन्सुलेटर पुरवठा करणे, मोटर रेडीएटर स्वच्छ करणेबाबत. | १,१६,२४,१०३/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ०२/०२/२०२५ ते दिनांक ०९/०२/२०२५
ई-निविदा उघडणे :- दिनांक ११/०२/२०२५ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे

खालील ठिकाणी ई.निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
३)कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन यांत्रिकी व विद्युत पथक, ओगलेवाडी कराड यांचे कार्यालयातील सुचना फलक.
४) या कामाच्या निविदेसाठी पश्चात अर्हता पध्दती लागू आहे.

जा.क्र.टेंऊसिंयांवविपओ/लेशा-२/११६/२०२५
टेंभू उपसा सिंचन यांत्रिकी व विद्युत पथक,
ओगलेवाडी कराड.
दि.२२/०१/२०२५

सही/-
कार्यकारी अभियंता
टेंभू उपसा सिंचन यांत्रिकी व विद्युत पथक,
ओगलेवाडी कराड.

डीजीआयपीआर/आरओसी-२०२४-२०२५/क्र.-५/सी/६०२५